# सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

नोंदणी क्रमांक-एन.बी.ओ.एम./सिडको/एच.एस.जी./(टी.सी.)/९८४१/जेटीआर/सन २०२३-२०२४
ई-१/६ ते ई-१/१०, भूखंड क्र. ०२, सेक्टर- १४, नवीन पनवेल (पुर्व), नवी मुंबई.

संदर्भ, 82/2025

दिनांक : 6/01/2025

## - परिपत्रक -

सहयाद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित च्या सर्वसदनिका धारकांना सुचित करण्यात येते की, संस्था स्थापन होऊन वर्षाभरापेक्षा ज्यास्त कालावधी होऊन गेला तरीही वारंवार सदनिका धारकांना सुचित करूनही बरेचसे सदनिका धारक आपले मासिक देखभाल शुल्क भरत नसल्याने पैशा अभावी सेवा सुविधा वर होणाऱ्या खर्चाचे नियोजन करणे कठीण जात असल्याने विशेष सर्वसाधारण सभा क्र११.दिनांक २२/१२/२०२४.. ठराव क्र.४ नुसार शुल्क वसूल करण्यासाठी संस्थेच्या उपविधी (बायलॉज)मधील तरतूदीनुसार व्याज आकारून वसूल करण्यात यावे असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

संस्थेच्या उपविधी (बायलॉज)मधील कलम ७१ नुसार ज्या सदनिकाधारकांचे देखभाल शुल्क ९० दिवसापेक्षा ज्यास्त असेल अशा थकित देखभाल शुल्कावर २१% दराने व्याज आकारण्याची तरतुद असल्याने त्याची अमलबजावणी करण्यासाठी दिनांक ०२/०१/२०२५ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारणी च्या सभेमध्ये तसा ठराव घेऊन बहुमताने संमत करण्यात आला त्यानुसार १७/०१/२०२५ पर्यंत थकीत देखभाल शुल्क भरणे आवश्यक आहे .त्यानंतर दिनांक १८/०१/२०२५ पासून व्याज आकारणी करण्यात येणार असून कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही किंवा सवलत दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.व ज्या सदनिका धारकांचा देखभाल शुल्क थकीत आहे अशा सर्व सदनिका धारकांनी निर्देशीत दिनांकापूर्वी ते भरावे व भविष्यात आपले देखभाल शुल्क थकित होणार नाही याची दक्षता घघ्यावी.

सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
नवीन पनवेल

अध्यक्ष | सचिव | खजिनदार